॥ दसरा ॥
विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा

# विदर्भ प्रजासत्ताक

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026 RNI No. - MAHMAR 2023/84526

❏ वर्ष - २ रे ❏ अंक -२३२ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. १२ ऑक्टोंबर २०२४ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६




॥दसरा॥

विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा

# विदर्भ प्रजासत्ताक

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026     RNI No. - MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १२ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




## आज विजयादशमी...!!

## कुप्रवृत्तींवर सत्प्रवृत्तींच्या विजयाचा दिवस

दसरा हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहे, जो विविध परंपरा, कथा आणि मूल्ये घेऊन येतो. 'विजयादशमी' म्हणूनही ओळखला जाणारा हा सण चांगल्याचा वाईटावर विजय दर्शवतो. रामायण आणि महाभारतासारख्या महाकाव्यांमध्ये याचा उल्लेख आहे, दसऱ्याशी रामायणातील एक प्रमुख घटना जोडलेली आहे. प्रभू रामाने रावणाचा वध केला, जो अत्याचारी राजा आणि ज्ञानाचा अपमान करणारा होता. हा प्रसंग नीतिमत्तेचा विजय आणि वाईट विचारांवर नियंत्रण मिळवण्याचे प्रतीक आहे. रावण दहा शिरांचा होता, ज्यांना घमंड, क्रोध, लोभ, वासना, मत्सर, मोह, माया, स्वार्थ, द्वेष आणि अहंकार अशा नकारात्मक प्रवृत्तींचे प्रतीक मानले जाते. त्यांचा नाश म्हणजेच दसरा. पांडवांनी कौरवांवर विजय मिळवला. त्यामुळे, दसरा केवळ विजयाचा उत्सव नाही, तर सत्य, नीतिमत्ता, आणि संघर्षांमधील धैर्याचे प्रतीक आहे.दसऱ्याच्या निमित्ताने भारतीय समाजातील विविध भागांमध्ये वेगवेगळ्या प्रथांचे पालन केले जाते. महाराष्ट्रात दसऱ्याच्या दिवशी शमी वृक्षाची पूजा केली जाते. पांडवांनी आपल्या वनवासाच्या काळात आपल्या शस्त्रास्त्रांची शमी वृक्षाखाली गुप्त ठेवली होती, असे मानले जाते. त्यांच्या विजयाच्या स्मरणार्थ शमीची पूजा केली जाते आणि ती विजयी भव, असा आशीर्वाद देते. तर बंगालमध्ये दुर्गा पूजेचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून हा सण साजरा केला जातो. दुर्गा मातेच्या महिषासुरावर विजयाचेही प्रतीक मानला जातो. या गोष्टीत महिषासुर नावाचा असुर अत्यंत शक्तिशाली झाल्यामुळे देव आणि मानवांच्या जीवनात अराजक माजले होते. त्याचा नाश दुर्गा मातेने केला, ज्यामुळे सृजनशक्तीच्या विजयाचे प्रतीक म्हणून दसरा महत्त्वाचे मानले जाते. कर्नाटकातील मैसूर शहरातही दसऱ्याच्या धूमधडाक्याने सण साजरा केला जातो. सर्वच प्रथा आणि समारंभांचा मुख्य धागा म्हणजे वाईट प्रवृत्तींवर चांगुलपणाचा विजय आणि सामाजिक सलोख्याचा संदेश.दसऱ्याच्या निमित्ताने शस्त्रपूजन करण्याची प्रथा देखील आहे, ज्यामुळे आपण स्वतःला सुधारण्यासाठी आणि समाजात शांती आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या दायित्वाची आठवण होते. या सणाच्या काळात बाजारपेठांमध्येही उत्साहाचे वातावरण असते, कारण लोक नवीन वस्त्र, आभूषणे, आणि इतर वस्तू खरेदी करून सण साजरा करतात.दसरा सण केवळ विजयाचा उत्सव नसून तो आपल्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील अंधकारावर प्रकाश टाकण्याचे प्रतीक आहे.आमच्या असंख्य वाचकांना, शुभचिंतकांना विजया दशमीच्या खूप खूप शुभेच्छा !



**प्रा.शुभांगी जोशी**
संपादक

## देशात कट्टरतावादाला चिथावणी देणाऱ्या घटनांमध्ये अचानक वाढ; सरसंघचालकांनी व्यक्त केली चिंता

### ओटीटी प्लॅटफॉर्म बाबत हि सरसंघचालकांचे परखड मत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

गेल्या काही वर्षांमध्ये माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठे बदल झालेले आहेत. या क्षेत्रात आपल्याला अनपेक्षित असे अविष्कार पाहायला मिळत आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म हेदेखील यापैकीच एक आहे. दरम्यान, या क्षेत्रात वेगवेगळे बदल झाल्यामुळे त्यावर नजर ठेवण्यासाठी तसेच विशिष्ट चौकट ठरवून देण्यासाठी सर्वसमावेशक नियमांची गरज व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर सरसंघचालक मोहन भागवत यांनी चिंता व्यक्त केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी सोहळ्यात ते बोलत होते.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शनिवारी ९९ वर्ष पूर्ण झाले व संघाने शताब्दी वर्षात पदार्पण केले. रेशीमबाग येथे शनिवारी विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला इस्रोचे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आज भारतात सर्वत्र मूल्यांचा ऱ्हास आणि भेदभाव करणाऱ्या घटकांच्या समाज तोडण्याच्या खेळी दिसत आहेत. जात, भाषा, प्रदेश इत्यादी छोट्या वैशिष्ट्यांच्या आधारे सामान्य समाजाला वेगळे करून संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे आज देशाच्या वायव्य सीमेला लागून असलेल्या पंजाब, जम्मू-काश्मीर, लडाख; सागरी सीमाक्षेत्रातील केरळ, तामिळनाडू आणि बिहारपासून मणिपूरपर्यंत संपूर्ण पूर्वांचल अस्वस्थ आहे. देशात विनाकारण कट्टरतावादाला चिथावणी देणाऱ्या घटनांमध्येही अचानक वाढ होताना दिसते आहे. परिस्थिती किंवा धोरणांबद्दल असंतोष असू शकतो,



परंतु ते व्यक्त करण्याचे आणि विरोध करण्याचे लोकशाही मार्ग आहेत. त्यांचे पालन न करता हिंसाचार करणे, समाजातील एखाद्या विशिष्ट वर्गावर हल्ला करणे, विनाकारण हिंसाचार करणे, भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, ही गुंडगिरी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अशा वागण्याला 'अराजकतेचे असे म्हटले आहे, याकडे सरसंघचालकांनी लक्ष वेधले. यावेळी स्वयंसेवकांनी विविध शारीरिक प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

विविध यंत्रणा आणि संस्थांकडून पसरवलेला विकृत प्रचार आणि वाईट मूल्ये भारतातील नवीन पिढीच्या विचारांवर, शब्दांवर आणि कृतींवर वाईट परिणाम करत आहेत. मोठ्यांसोबतच मुलांच्या हातातही मोबाईल पोहोचला आहे, तिथे काय दाखवलं जातं, मुलं काय पाहत आहेत, यावर फारसा नियंत्रण नाही. साहित्याचा उल्लेख करणे म्हणजे सभ्यतेचे उल्लंघन होईल, हे अत्यंत घृणास्पद आहे. आपल्या स्वतःच्या घरात, कुटुंबात आणि समाजात जाहिराती आणि विकृत दृक-श्राव्य सामग्रीवर कायदेशीर नियंत्रणाची नितांत गरज आहे. तरुण पिढीमध्ये वणव्यासारखी पसरत चाललेली अमली पदार्थाची सवय समाजालाही आतून पोकळ करत आहे. चांगुलपणाकडे नेणाऱ्या मूल्यांचे पुनरुज्जीवन करावे लागेल.

स्त्रियांकडे पाहण्याचा चांगला दृष्टीकोन ही आपली सांस्कृतिक देणगी आहे. जी आपल्याला आपल्या सांस्कृतिक परंपरेतून मिळते. याचे भान नसणे, ज्या कुटुंबांतून आणि ज्या माध्यमांतून समाजाला केवळ करमणूकच नाही तर ज्ञानप्राप्तीही होत आहे, त्या माध्यमांतून या मूल्यांकडे दुर्लक्ष करणे किंवा अनादर करणे हे जाणूनबुजून किंवा नकळत खूप महागात पडते आहे. कुटुंब, समाज आणि प्रसारमाध्यमांद्वारे ही सांस्कृतिक मूल्ये रुजवण्याची व्यवस्था पुन्हा जागृत करायची असल्याचे भागवत म्हणाले.

**ओटीटी प्लॅटफॉर्मवर नेमकं काय म्हणाले भागवत?**

सोशल मिडीयाचा वापर समाजाला जोडण्यासाठी केला जातो, तो तोडण्यासाठी नाही तर सुसंस्कृत बनवण्यासाठी आणि वाईट संस्कृती पसरवण्यासाठी नाही याची काळजी सर्व सज्जनांनी घ्यावी. मात्र आज ओटीटी प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात येणाऱ्या गोष्टींमूळे समाज बिघडत चालले आहे. कायद्याच्या चौकटीत आणने आवश्यक आहे असे आवाहन सरसंघचालक डॉ भागवत यांनी केले.

## नागपुरात लोटला भीम सागर

### निळ्या रंगाच्या सम्यक पताकांनी सजली दीक्षाभूमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या दिवसाची आठवण आणि बाबासाहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत. ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा शनिवारी सायंकाळी ६ वाजता भिक्खू संघाच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यंदा प्रथमच मंचावर कुठल्याही राजकीय नेत्याला स्थान दिले जाणार नाही.

धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून कुशीनगर, उत्तरप्रदेश येथील भिक्खू संघाचे अध्यक्ष भदंत ज्ञानेश्वर, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा उपस्थित राहतील. भदंत ज्ञानेश्वर हे बाबासाहेबांना दीक्षा देणारे भदंत चंद्रमणी महास्थवीर यांचे शिष्य आहेत. याशिवाय मंचावर स्मारक समितीचे अध्यक्ष आर्य नागार्जुन सुरई ससाई यांचीही उपस्थिती राहील, धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यावर पावसाचे सावट असल्यामुळे प्रशासन आणि स्मारक समितीच्यावतीने विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. आयटीआय परिसरात प्रशासनाने अनुयायांच्या निवाऱ्यासाठी मोठे मंडप टाकले आहेत. याशिवाय अधिक पाऊस झाल्यास परिसरातील शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांनाही उघडण्यात येईल.शुक्रवारी सकाळी ९ वाजता धम्मदीक्षा सोहळ्याच्या मुख्य मंचाजवळ पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर समता सैनिक दलाने पथसंचालन केले आणि मानवंदना दिली. सायंकाळी मुख्य मंचावर बुद्ध-भीम गीतांचा कार्यक्रम पार पडला. शनिवारी सकाळी ९ वाजता विशेष बुद्ध वंदना घेतली गेली, त्यानंतर बावीस प्रतिज्ञांचे वाचन करण्यात आले. शहरातील सर्व बुद्ध विहारात एकाच वेळी चुद्धवंदना घेण्याचे आवाहन स्मारक समितीने केले होते.

## नायब सिंह सैनी १७ ऑक्टोबरला हरियाणाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार

### पंतप्रधान नरेंद्र मोदीही राहणार उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२पंचकुला हरियाणा**

हरियाणा विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवणारी भारतीय जनता पार्टी आता सत्तास्थापन करणार आहे. येत्या १७ ऑक्टोबर रोजी भाजपा नेते व माजी मुख्यमंत्री नायब सिंह सैनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. त्यांच्याबरोबर भाजपाचे इतर काही आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. पंचकुला सेक्टर ५ येथे सकाळी १० वाजता हा शपथविधी समारंभ पार पडेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाचे अनेक वरिष्ठ नेते या शपथविधी सोहळ्याला हजेरी लावणार आहेत.हा शपथविधी १५ ऑक्टोबरला होणार असल्याची चर्चा रंगत होती. मात्र, आता १७ ऑक्टोबर ही तारीख जाहीर करण्यात आली आहे.

केंद्रीय मंत्री व हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर म्हणाले, आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून मंजुरी मिळाली आहे. येत्या



१७ ऑक्टोबर रोजी पंचकुलामध्ये मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांचे शपथविधी पार पडतील. अलीकडेच दिल्लीत खट्टर व नायब सिंह सैनी यांची भेट झाली होती. दरम्यान, नायब सिंह सैनी यांच्या शपथविधीसाठी हरियाणा भाजपाने तयारी सुरू केली आहे.माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या जागी नायब सिंह सैनी हरियाणाचे मुख्यमंत्री झाले होते. खट्टर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवली. तर, नायब सिंह सैनी मुख्यमंत्री झाल्याने भाजपाची राज्यातील राजकीय समीकरणं बदलली. याचा निवडणुकीत भाजपाला फायदा झाला.

## दुर्दैवाने राज ठाकरे महाराष्ट्र लुटणाऱ्यांच्या पाठीशी; पॉडकास्टवरुन संजय राऊतांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

दसऱ्याच्या निमित्ताने राज्यात चार दसरा विविध मेळाव्यांचे आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा आणि शिवसेना शिंदे गटाच्या दसऱ्या मेळावाच्या आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने ठाकरे गट आणि शिंदे गट पुन्हा एकदा आक्रमक झाला आहे. दुसरीकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही पॉडकॉस्टच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला. यावेळी राज ठाकरे यांनी महाराष्ट्राचे सोनं गेली अनेक वर्ष लुटलं



जात आहे, अशी टीका केली. तसेच विधानसभा निवडणुकीत मतदानावेळी बेसावध राहू नका असं आवाहन राज ठाकरेंनी केले. राज ठाकरेंच्या पॉडकास्टवरुन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दसऱ्यानिमित्त राज्यातील जनतेशी, मनसेच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. महाराष्ट्र साकारण्यासाठी मला संधी द्या, असे आवाहन यावेळी राज ठाकरे यांनी केलं. महाराष्ट्र लुटण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत मतदारांनी बेसावध न होता मतदान करावं असं राज ठाकरे यांनी म्हटलं. माध्यमांनी यावेळी यावरुनच संजय राऊत यांना सवाल विचारला. त्यावर बोलताना राज ठाकरेंनी महाराष्ट्र लुटीला समर्थन दिलं असल्याचे संजय राऊत म्हणाले.

## भारताच्या हिताला बाधा येते तेव्हा शस्त्र उचलले जाते - संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२प.बंगाल**

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दसरा सोहळ्याच्या निमित्ताने पश्चिम बंगाल येथील सुकन्या सैन्य तळावर पारंपारिक पद्धतीने शस्त्रास्त्रांची विधीवत पूजा केली. या दरम्यान त्यांनी शस्त्रास्त्र पूजे संबंधी अनेक महत्वाच्या बाबी सांगितल्या. भारत जरी शांतताप्रिय देश असला तरी गरज पडल्यास या शस्त्रास्त्रांचा वापर करीत आला आहे. संरक्षण मंत्र्यांनी कलश पूजेने या शस्त्रास्त्रांच्या पूजेची सुरुवात केली. त्यानंतर सैन्यांच्या मशिन गन आणि वाहनांची पूजा केली. त्यांनी अत्याधुनिक पायदळ, तोफखाना, आणि संचार वाहने, ड्रोन यांची देखील पूजा केली.



या प्रसंगी राजनाथ सिंह यांनी आमच्या हिताला काही धोका निर्माण होतो. तेव्हा आम्ही कोणतेही मोठे पाऊल उचलायला संकोच करत नाही. शस्त्रपूजा म्हणजे स्पष्ट संकेत आहे की गरज पडेल तेव्हा या हत्यारे आणि उपकरणांचा संपूर्ण ताकदीने वापर केला जाईल.राजनाथ सिंह यांनी सांगितले की शक्ती, यश, संरक्षणासाठी आशीर्वाद मागण्यासाठी केल्या जाणाऱ्या दसरा सोहळ्याचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्व मोठे आहे. या संरक्षण हत्यार प्रणालीच्या महत्व मोठे आहे. भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी स्वदेशी संरक्षण प्रणाली इतर शस्त्रास्त्रांत वाढ करण्यावर आमच्या सरकारचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला थळ सेनाध्यक्ष जनरल उपेन्द्र द्विवेदी, संरक्षण सचिव आर.के. सिंह,इस्टर्न कमांडचे जनरल ऑफीस कमांडिग-इन-चीफ लेफ्टिनंट जनरल राम चंद्र तिवारी, बोर्डर रोडचे महासंचालक लेफ्टनंट जनरल रघु श्रीनिवासन, त्रिशक्ति कोअरचे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टिनंट जनरल जुबिन ए. मिनवाला आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय ......

# नवे युग, नवे सीमोल्लंघन

*'आश्विन शुद्ध दशमी' हा दिवस विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. दसरा हा सण भारतीय परंपरेनुसार साडेतीन मुहूर्तांपैकी एक होय. 'विविधतेत एकता' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य व वेगळेपण या सणाच्या निमित्ताने दिसून येते. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजिता पूजन आणि शस्त्रपूजन केले जाते. त्यामुळे हा दिवस ऐतिहासिक विजयाचे स्मरण करणारा आणि भारतीय समाजाचे रक्षण करणारा तसेच शौर्य, पराक्रम आणि विद्वत्ता यांचा गौरव करणारा दिवस आहे. आज २१ व्या शतकात विजयादशमीच्या नव्या पर्वकाळात नवे सीमोल्लंघन करणे आवश्यक आहे.*

*बदलत्या काळात भारतीय सण, समारंभ आणि उत्सव यांचा नवा अर्थ शोधला पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करता असे दिसते की, उत्सवांना एक पारंपरिक अर्थ असतो. लोक त्यामागील परंपरा व इतिहास विसरतात आणि केवळ प्रतीकात्मक दृष्टीने उत्सव साजरे केले जातात. या पार्श्वभूमीवर विजयादशमीच्या नव्या पर्वकाळात नवे सीमोल्लंघन करणे आवश्यक आहे. आश्विन शुद्ध दशमी हा दिवस विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. विजयादशमी किंवा दसरा हा सण भारतीय परंपरेनुसार साडेतीन मुहूर्तांपैकी एक होय. या दिवशी उत्तमोत्तम संकल्प करून ते सिद्धीस नेण्याचा प्रयत्न केला जातो. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांनी रावणाचा पराभव केला आणि या दिवशी ते पुनःश्च अयोध्येत परतले. यानिमित्ताने गुढ्या उभारल्या जातात आणि विजयी पताका फडकत ठेवून आनंदोत्सव साजरा केला जातो. या पराक्रमाचे प्रतीक म्हणून शस्त्रपूजन केले जाते आणि ज्ञानसामर्थ्याचे प्रतीक म्हणून 'सारस्वत पुत्र' ग्रंथाचेही पूजन करतात.*

*मध्ययुगीन वीर मराठे व राजपूत विजयादशमीच्या शुभ दिवशीच अन्याय करणार्या मुघलांविरुद्ध युद्ध मोहिमांना प्रारंभ करत असत. आपला इतिहास नव्याने सुवर्णाक्षराने लिहिण्याचा संकल्प प्राचीन व मध्ययुगीन काळात महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज यांनी याच दिवशी केला. त्यामुळे स्वातंत्र्याचे व स्वराज्याचे रक्षण करण्याचा हा संकल्प दिवस होय, असे मानले जाते. या दिवशी सरस्वतीची पूजा करून सर्वोच्च धन असलेल्या ज्ञानाची उपासना केली जाते. पाटीवर 'श्री गणेशाय नमः' असे लिहून पाटीपूजा केली जाते. तसेच पूजनीय ग्रंथ समोर ठेवून त्यातील विचारांचेही महत्त्व जाणले जाते.*

*नवरात्रीच्या निमित्ताने देवीचे जागरण केले जाते. दुर्गा किवा भवानी ही महिषासुराचे मर्दन करते. अन्याय आणि आसुर प्रवृत्तीवर ती मात करते. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य उभारणीची प्रेरणा तुळजापूरच्या भवानीमातेने राजांच्या स्वप्नात येऊन दिली, असे 'सभासद' बखरीत नमूद केले आहे. देवीच्या घटाची स्थापना आश्विन शुद्ध प्रतिपदेला केल्यानंतर देवीचे नवरात्र सुरू होतात आणि दहाव्या दिवशी विजयादशमीच्या सणाचा उत्सव साजरा केला जातो. महाराष्ट्रात दसर्याच्या दिवशी परस्परांना सोने म्हणून शमी व आपट्याची पाने दिली जातात. या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजिता पूजन आणि शस्त्रपूजन केले जाते. त्यामुळे हा दिवस ऐतिहासिक विजयाचे स्मरण करणारा आणि भारतीय समाजाचे रक्षण करणारा तसेच शौर्य, पराक्रम आणि विद्वत्ता यांचा गौरव करणारा दिवस आहे. विजयादशमी हा सण भारतीय कृषी जीवनाशी नाते जोडणारा आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात हा एक कृषी संस्कृतीशी निगडीत लोकोत्सव होता. पिकांची निगा व काळजी घेतल्यानंतर धन-धान्य घरी येत असे. त्यावेळी होणारा आनंद व्यक्त करण्यासाठी ग्रामीण भागात हा सण साजरा केला जात असे.*

*उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम भारतात चहू दिशांमध्ये दसरा वेगवेगळ्या पद्धतीने व तेवढ्याच उत्साहाने साजरा केला जातो. 'विविधतेत एकता' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य व वेगळेपण दसरा सणाच्या निमित्ताने दिसून येते. दसर्याच्या दिवशी आपल्या गावाच्या, शहराच्या सीमा ओलांडून शमी व आपट्याची पाने आणली जातात व ती एकमेकांना देऊन अभीष्टचिंतन केले जाते. ही पाने म्हणजे सोन्या-चांदीचे प्रतीक आहेत, असे समजून ती समाजामध्ये एकमेकांना वाटली जातात. दसरा भारतामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. उत्तर प्रदेशात या दिवशी रावणाचे दहन करण्याची परंपरा आहे. तसेच राजस्थान व मध्य प्रदेशातसुद्धा हा सण प्रभू रामचंद्रांच्या विजयाचे प्रतीक म्हणून गुढी उभारून साजरा केला जातो. बंगालमध्ये दुर्गापुजेला महत्त्व असून या पूजेच्या अंतिम चरणात दशहरा म्हणजे दसरा साजरा केला जातो. सर्व प्रांतामध्ये म्हैसूरचा दसरा सर्वात प्रसिद्ध आहे. येथे गजराजांचा उपयोग करून सीमोल्लंघनाची मिरवणूक काढली जाते.*

# इतर वेळी पूजेत आंब्याचे, विड्याचे पान; पण दसर्याला का बरं आपट्याच्या पानाला मान?

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक-** दरवर्षी दसऱ्याला आपण सोने म्हणून आपट्याची पाने एकमेकांना देतो, नव्हे तर त्याला सोने लुटणे असे म्हणतो. परंतु वर्षभरात याच आपट्याच्या पानांकडे आपले लक्षसुद्धा जात नाही. मग एरव्ही तुळशीची किंवा बेलाची, आंब्याची पाने पवित्र म्हणून पूजेत वापरली जात असताना दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर आपट्याची पानेच का देतात, यामागील पौराणिक कथा जाणून घ्या.

पैठण शहरात देवदत्त नावाच्या एका गृहस्थास कौत्स नावाचा हुशार आणि सद्गुणी मुलगा होता. तो विद्यासंपादनासाठी वरतंतु ऋषींच्या घरी येऊन राहिला होता. त्या काळात ऋषींच्या म्हणजे गुरुच्या घरी राहूनच विद्या संपादन करण्याचा परिपाठ होता. कौत्स जात्याच हुशार असल्यामुळे तो थोड्याच दिवसात सर्व शास्त्रांमध्ये प्रवीण झाला. गुरुंचा आश्रम सोडताना काय गुरुदक्षिणा द्यावी, या विचारात पडून त्याने शेवटी गुरुंनाच ऋमी काय गुरुदक्षिणा द्यावी?' असे विचारले. यावर गुरु म्हणाले, 'गुरुदक्षिणा मिळावी, म्हणून मी तुला विद्या शिकवली नाही. शिष्य विद्या उत्तम शिकला की गुरुला गुरुदक्षिणा मिळाली.' पण या उत्तराने कौत्साचे समाधान झाले नाही. तो पुन्हा पुन्हा काय गुरुदक्षिणा देऊ, विचारत राहिला.

शेवटी वरतंतु म्हणाले, 'मी तुला चौदा विद्या शिकवल्या. प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी याप्रमाणे मला तू चौदा कोटी सुवर्णमुद्रा आणून दे.पण त्या अनेकांकडून जमा केलेल्या नकोत. एकाच दात्याकडून आणलेल्या असल्या पाहिजेत.'

गुरुजींची ही अट पाळणे कौत्सास




थोडे कठीण गेले. त्यावेळी सिंहासनावर असलेला रघुराजा म्हणजे प्रभू रामचंद्रांचा पूर्वज, हा उदार आणि विद्वानांची कदर करणारा आहे, हे कौत्साला माहित होते. तो मोठ्या आशेने रघुराजाकडे गेला. त्याने आपली मागणी रघुराजासमोर मांडली. पण त्यावेळी रघुराजाची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. त्याने यज्ञयागात आपली सर्व संपत्ती दान केली होती. राजापासून आपणास काही अर्थलाभ होण्याची शक्यता नाही, हे ध्यानी येताच कौत्स परत जाऊ लागला.

आपल्या दारी आलेला याचक रिक्तहस्ताने परत जाऊ नये, म्हणून रघुराजाने प्रत्यक्ष इंद्रावर चढाई करून त्याच्याकडून सुवर्णमुद्रा आणाव्यात, अशा निश्चय केला. हे इंद्राला समजताच, इंद्राने अयोध्यानगरीच्या बाहेर असलेल्या आपट्याच्या आणि शमीच्या झाडावर कुबेराकडून सुवर्णमुद्रांचा वर्षाव करवला. त्या सर्व सुवर्णमुद्रा घेऊन रघुराजाने कौत्साला दिल्या. कौत्साने त्या मुद्रा आपल्या गुरुंसमोर ठेवून स्वीकारण्याची विनंती केली. गुरुंनी फक्त चौदा कोटी मुद्रा घेतल्या आणि बाकीच्या कौत्सास परत दिल्या. परत मिळालेल्या सुवर्णमुद्रा या आपल्या नव्हेत, म्हणून कौत्साने रघुराजाकडे त्या परत आणल्या. पण रघुराजा म्हणाला, ऋया माझ्याही नव्हेत, आता त्या तुझ्याच आहेत. मी त्या घेणार नाही.' कौत्साला ते पटले नाही. त्याने ज्या आपट्याच्या आणि शमीच्या झाडाखाली या सुवर्णमुद्रा पूर्वी मिळाल्या होत्या, तिथे त्या नेऊन ठेवल्या आणि लोकांना त्या लुटून न्या असे सांगितले. तो दिवस होता...विजयादशमीचा!

आपल्या पुराणात विजयादशमीसंबंधीच्या विविध स्वरूपाच्या कथा आहेत. ही वरतंतु आणि कौत्स या गुरु-शिष्यांची गोष्ट आपणास काय सांगते? यामध्ये गुरुची ऋण फेडण्याची शिष्याची तळमळ दिसते. आपण शिकवलेल्या ज्ञानाची पैशाच्या हिशोबात किंमत होऊ शकत नाही, हा गुरुंचा तेजस्वी विचार दिसतो. विद्वान पंडितांची चिंता दूर करण्यासाठी राजाची कळकळ दिसते आणि जे आपले नाही, त्याचा स्वीकार करण्यासा राजा रघु, गुरु वरतंतु, शिष्य कौत्स यापैकी कोणीही तयार होत नाहीत, यामागची त्यांची निरिच्छा दिसते. आपल्या संस्कृतीने त्याग, प्रेम, नम्रता हा संस्कार या कथेतून दिसतो. आपणही हे वैचारिक सोने लुटण्याचा प्रयत्न करूया.

**दसऱ्याच्या शुभेच्छा!**

# भाजीपाला पिकांची लागवड करण्यापूर्वी कोणत्या गोष्टींचा अभ्यास कराल?

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक**

भाजीपाला लागवडीचे नियोजन करत असाल तर लागवड करता असताना लागवडीसाठी लागणारे काही महत्त्वाच्या घटक म्हणजे जमीन, पाणी, खते, सूर्यप्रकाश, औषधे, चांगल्या गुणवत्तेची रोपे/बियाणे इ. गोष्टींची उपलब्धता आहे का हे पाहूनच पुढे जावे.

भाजीपाला लागवडी अगोदर कोणत्या गोष्टींचा अभ्यास करावा?

कृषी विशेष




### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

- भाजीपाला लागवडीसाठी ठिबक सिंचन प्रणालीचा वापर केल्यास कमी पाण्यातही उत्पादन घेता येते. त्याचबरोबरच विद्राव्य खतांचा वापर प्रभावीपणे होतो.

- बदलत्या तापमानामुळे उन्हाळ्यात भाजीपाला पिकवणे कठीण झाले आहे. म्हणून ५०% शेडनेटचा वापर करून तापमान नियंत्रण करता येते. त्यामुळे उन्हाळ्यातही पालेभाज्या व फळभाज्यांचे उत्पादन घेऊन चांगले उत्पन्न मिळवता येते.

- याशिवाय तापमान कमी करण्यासाठी तुषार सिंचन प्रणाली वापरणे फायदेशीर ठरते.

१) सध्याच्या बाजारपेठेतील मागणी पाहता, सेंद्रिय भाजीपाल्याला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे आपण जास्तीत जास्त सेंद्रिय खते व निविष्ठांचा वापर करून भाजीपाला पिकवल्यास ग्राहकांची पसंती मिळेल आणि त्यातून चांगला नफा मिळू शकतो.

२) उन्हाळ्यात भाजीपाला लागवड केल्यास बाजारात चांगला दर मिळतो, मग ते पालेभाज्या असोत की फळभाज्या, वातावरणातील बदलामुळे भाजीपाला शेतीत अडचणी वाढल्या आहेत. आपण या अडचणींना संधी मानून उन्हाळ्यात भाजीपाला पिकवून चांगला नफा मिळवू शकतो.

३) मार्केटचा सखोल अभ्यास असणे महत्त्वाचे आहे. बरेच शेतकरी ज्या भाजीपाल्याला जास्त दर असतो त्याचीच लागवड करतात, परंतु नंतर त्याच मालाची बाजारात भरपूर आवक झाल्यामुळे दर घसरतात. त्यामुळे बाजारपेठेचा अभ्यास करून योग्य पिकाची निवड करणे गरजेचे आहे.

### भाजीपाला लागवडीतील अडचणी

भाजीपाला लागवडीमधील अडचणी पहिल्या तर इच्छाशक्तीचा अभाव, वातावरणातील बदल, मजुरांची कमी उपलब्धता, अतिवृष्टी, उच्च तापमान, जीवघेणी थंडी या नैसर्गिक अडचणी आहेत.

### भाजीपाला उत्पादकता कशी वाढवावी?

जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर, चांगल्या वाणाचे बियाणे वापरणे आवश्यक आहे. तसेच गुणवत्तापूर्ण रोपांची लागवड करणे, रोग व किड प्रतिबंधक उपाययोजना करणे, उपयुक्त जिवाणू व बुरशींचा वापर परसबागेत करणे आवश्यक असल्याचे ते सांगतात.

कोणती पिके फायदेशीर ठरू शकतात?

फायदेशीर पिकांचा विचार करता मेथी, पालक, कोथिंबीर, कोबी, बीटरूट, फ्लॉवर, मिरची, वांगी यांची वर्षभर चांगली मागणी असते.

खर्च नियंत्रण करण्यासाठी उपाययोजना

लागवड करत असताना खर्चावर नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक असून त्यासाठी जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर करणे, जैविक सेंद्रिय निविष्ठांचा वापर करणे, रोग व किड प्रतिबंधक उपाययोजना केल्यास पुढील खर्च टाळता येतो, तसेच नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यासही खर्चावर नियंत्रण येते.

### भाजीपाला पिकातील संधी

२० गुंठ्यातही भाजीपाला लागवड शक्य आहे. त्याचप्रमाणे स्थानिक बाजारपेठेत भाजीपाल्याची विक्री करून चांगले उत्पन्न मिळवता येते. शिवाय विक्री दरम्यान शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीची संकल्पना प्रत्यक्षात उतरवता येईल. ८-१० जणांचा गट करून उच्च प्रतिचा भाजीपाला इतर बाजारपेठेत विकू शकतो.

**- प्रविण ननावरे**
भाजीपाला रोपवाटिका तज्ञ




# जिममधील खांद्याच्या दुखापती टाळण्यासाठी

***दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक***

*जिममध्ये व्यायाम करताना खांद्याच्या दुखण्यामागे बरीच कारणे असू शकतात. दुखापत, सातत्याने होणारी हालचाल, वजनदार वस्तू उचलणे, अपघात, खेळणे किंवा वाढते वय या कारणांमुळे खांद्याचे दुखणे उद्भवू शकते.*



*खांद्याच्या दुखण्यामुळे खा हाताच्या हालचालीवर मर्यादा येते. खांद्यामध्ये तीन महत्त्वाची हाडे असतात. ही हाडे खांद्यांच्या सांध्यांशी जोडलेली असतात. खांद्याच्या कोणत्याही भागात या वेदना जाणवू शकतात.यामुळे रोटेटर कफ टिअर्स, खांद्याला इजा होणे, बर्साइटिस, फ्रोझन शोल्डर, टेंडोनिटिस आणि अगदी फॅक्चर यासारख्या विविध समस्यांचा धोका वाढू शकतो. काही महत्त्वाच्या टिप्स खांद्याला दुखापत होण्यापासून टाळतात.*

***वॉर्म अप करावे :****वर्कआऊट रुटीन सुरू करण्यापूर्वी व्यवस्थित वॉर्मअप करावा. वेदनामुक्त हालचालींसाठी आपल्या खांद्याचे स्नायू वॉर्मअप करावेत. स्ट्रेचिंग आणि कार्डिओ करावे.*

*कारण, ते हलके फुलके आणि सोपे आहेत. तसेच ते रक्तप्रवाह सुरळीत करण्यास प्रोत्साहन देतात. नियमित किमान ५ ते १० मिनिटे वॉर्मअप केले पाहिजे. ते तुमच्या खांद्यांना व्यायामापूर्वी तयार करतात. त्यामुळे खांद्यांना दुखापत होण्याचा धोकादेखील कमी होतो.*

***योग्य शारीरिक मुद्रा राखावी :****चुकीच्या शारीरिक मुद्रेमुळे खांद्याच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो. जास्त वजन उचलताना योग्य मुद्रा राखण्याचा प्रयत्न करावा. बेंच प्रेस, ओव्हरहेड लिफ्टस् किंवा ट्रायसेप्स एक्स्टेंशन,*

*अरनॉल्ड प्रेस, फ्रंट राईज किंवा लॅटरल राईजेस यासारख्या काही व्यायामादरम्यान चुकीची मुद्रा तुमच्या खांद्यावर अतिरिक्त ताण आणू शकते. तुमच्या सुरक्षिततोसाठी योग्य तंत्रे आणि पद्धती जाणून घ्याव्यात.*

***हळूहळू व्यायामाची तीव्रता वाढवावी :****जड उचलणे किंवा तीव्र कसरत करणे टाळावे. यामुळे खांद्याच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. तसेच खांद्यांना दुखापत आणि फ्रैक्चर होण्याची शक्यता असते.सुरुवातीला व्यायाम करतातना हळूहळू आपल्या व्यायामाची तीव्रता वाढवत जावी. हे स्नायू आणि सांध्यांना जुळवून घेण्यास मदत करते.*

***खांदा मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करावे :****खांद्याच्या दुखापतींचा धोका कमी करण्याचा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग म्हणजे स्नायू मजबूत करणे.*

# एम.आय.टी. (वल्ड पिस सेंटर) पुणे द्वारा ॲड. राजेंद्र पांडे सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती-** अमरावती येथील माहिती अधिकार कायद्याचे राष्ट्रीय प्रशिक्षक तथा जेष्ठ विधिज्ञ ॲड. राजेंद्र पांडे यांनी सन २००५ पासून माहिती अधिकार कायद्याचे महाराष्ट्र राज्य व राष्ट्रीय स्तरावरील छत्तीसगढ, गोवा, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या राज्यातील मंत्रालयांमध्ये व्याख्याने दिलेली आहेत तसेच महाराष्ट्र राज्यातील ज्युडीशियल ॲकेडमी ॲन्ड इंडीयन मेडीएशन सेंटर ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टीट्यूट उत्तन, बार्टी पुणे, यशदा पुणे, वनामती नागपुर, महाजनको प्रशिक्षण केंद्र कोराडी, कृषी विभागाचे रामेती प्रशिक्षण केंद्र अमरावती, नागपुर, महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक, संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुंबई, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रबोधिनी नाथनगर, पैठण, नाशिक महसूल प्रबोधिनी, राज्यातील सर्वच विद्यापीठे यांसह राज्यातील सर्वच जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषदा, पोलीस आयुक्त तसेच पोलीस अधिक्षक



कार्यालये येथे कायद्याची जाणीव जागृती केली. तसेच मध्य प्रदेशातील खरगोन येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय सेमीनार मध्ये मुख्य निमंत्रीत व्याख्याता म्हणून सहभाग घेतला आणि मार्गदर्शन केले. त्यांच्या माहिती अधिकार कायद्याच्या या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान एम.आय.टी. वल्ड पिस युनिव्हरसिटीचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ डी. कराड यांचे हस्ते एम.आय.टी.चे सभागृहात करण्यात आला.

यावेळी स्मृतीचिन्ह डॉ. कराड यांनी ॲड. राजेंद्र पांडे यांना देऊन त्यांचे कार्याचा गौरव केला. तसेच स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथून आणलेली भेट वस्तू त्यांना यावेळी प्रदान करण्यात आली. यावेळी ॲड. राजेंद्र पांडे यांनी मनोगताद्वारे उपस्थितांचे आभार मानलेत. याप्रसंगी वल्ड पिस डोम स्पिरिच्युएलीटी ओरीएन्टेड सायंटीफिक लेबॉरेटरी पायोनियर ऑफ व्हॅल्यु बेस्ड युनिव्हरसल एज्युकेशन सिस्टीम एम. आय.टी. पुणे चे डिन मिलिंद पत्रे व प्रकुलगुरु डॉ. मिलिंद पांडे यांनी ॲड. पांडे यांचा परिचय करुन दिला. मुंबई येथील विजयराव सबनीस याप्रसंगी आवर्जुन उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १२ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण




# उद्याला उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत अमरावती येथे जनसन्मान यात्रा सोहळा

## अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे संजय खोडके यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने अमरावती येथे येत आहेत. त्यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात रविवार १३ ऑक्टोबर २०२४ रोजी संत गाडगेबाबा समाधी मंदिर समोरील प्रांगण,गाडगे नगर अमरावती येथे दुपारी १.३० वाजता जनसन्मान यात्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावतीच्या विकासाला बळकटी व नवी दिशा देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी कोट्यावधींचा भरीव निधी उपलब्ध करून दिल्याने आज अमरावती विधानसभा क्षेत्रात अनेक विकास कामे मार्गी लागली आहेत. तसेच सरकारमध्ये असतांना जे काही धोरणात्मक निर्णय घेतले त्याचा सुद्धा अमरावतीला पुरेपूर लाभ झाला आहे. म्हणूनच ना.अजितदादा पवार यांचे आम्ही स्वागत व सत्कार करीत असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जनसन्मान यात्रा सोहळा अमरावतीचे संयोजक संजय खोडके यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.पुढे बोलतांना राकॉ नेता संजय खोडके यांनी माहिती दिली की, लोकशाहीवर दृढ विश्वास असल्याने ना.अजितदादा पवार यांनी सरकार मध्ये असतांना अनेक लोकाभिमुख योज़ना सुरु केल्यात. त्यांच्या ३५ वर्षाच्या राजकीय व सामाजिक कारकिर्दीत त्यांनी जनतेच्या हिताला प्राधान्य देऊन अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. त्यामुळे योजनांपुरती यात्रा मर्यादित न राहता समाज घटकांना काय अपेक्षित आहे, त्यांच्या नेमक्या काय भावना आहे. हे देखील जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून जाणून घेण्यात येत आहे. संपूर्ण राज्यभरात जनसन्मान यात्रेला जनतेचा अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभत आहे. आता ही जनसन्मान यात्रा अंतिम टप्यात असून अमरावती मधील यात्रेच्या निमित्ताने आम्ही त्यांचे स्वागत व सत्कार करीत आहोत. या साठी संत गाडगे बाबा समाधी मंदिर समोरील प्रांगणात भव्य डोम साकारून जवळपास २० हजार लोकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रविवार १३ ऑक्टोबर रोजी ना. अजितदादा पवार यांचे शहरात आगमन होताच सर्वप्रथम राजमाता माँ साहेब जिजाऊ स्मारक आरटीचौक येथे पुतळ्याला अभिवादन, तेथून इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा, नंतर पंचवटी चौक स्थित कृषी महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा पुतळा व तेथून संत गाडगेबाबा समाधी मंदिर येथे अभिवादन केल्या नंतर ना.अजितदादा पवार यांचे दुपारी १.३० वाजता जनसन्मान यात्रा सोहळाच्या विशाल मंचावर आगमन होणार आहे. असे सुद्धा संजय खोडके यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले.अमरावतीमधील जनसन्मान यात्रेची तयारी पूर्ण झाली असून आयोजनाला घेऊन सहकाऱ्यांच्या छोट्या-छोट्या समिती स्थापन करून जबाबदारी देण्यात आली आहे. शासकीय तंत्रनिकेतन अमरावती, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय (रूरल ) येथे वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे अमरावतीकरांच्या वतीने स्वागत व सत्कार करायचा असल्याने जनसन्मान सोहळ्याला अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जनसन्मान यात्रा अमरावतीचे संयोजक संजय खोडके यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे.

### अमरावतीच्या विकासासाठी निधी दिल्या बद्दल अजितदादा सत्कार-आ.सौ. सुलभाताई खोडके

पत्रकार परिषदेला उपस्थित आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी सांगितले की ,उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या पाठपुराव्याने अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील वर्ष २०२४ मध्ये नवीन वाढीव कर आकारणी व वसुलीला शासनाकडून स्थगनादेश मिळाला. तसेच शहरातील मालमत्ताधारकांना जुन्या कर प्रणालीनेच कर लागू करून बिले पाठविण्याची कार्यवाहीबाबत महापालिका आयुक्तांना आदेशानंतर अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघासाठी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी कोठ्यावधींचा भरीव निधी उपलब्ध करून दिला असून ज्यामध्ये रस्ते विकास व पायाभूत सुविधांची निर्मिती-७४२ कोटी, पाणी पुरवठा व वितरण योजना-१,००० कोटी, इमारती बांधकामे-७१९ कोटी, शैक्षणिक विकासाच्या सुविधा (सारथी केंद्र सह अन्य शैक्षणिक सुविधा )-२६३, आरोग्य सेवा सुविधा व विस्तार- १९६ कोटी,क्रीडा सुविधांची निर्मिती-८२ कोटी, आवास योज़ना-१९० कोटी,चौकांचे सौंदर्यीकरणासाठी २० कोटी,पर्यटन विकास- २७ कोटी, महावितरण सुविधांची कामे-४९ कोटी इतक्या प्रमाणात निधी मिळाला. त्यामुळे अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहे. या बद्दल उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार मानीत स्वागत व सत्कार करीत आहे. जनसन्मान सोहळ्याला अमरावतीकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुद्धा आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी पत्रकार परिषदेतून केले.

# होम हवनाने श्री अंबादेवी व श्री एकवीरादेवीच्या शारदीय नवरात्र उत्सवाची सांगता

## संयुक्त पालखी यात्रेत हजारो भक्तांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**गेल्या नऊ दिवसापासुन सुरू असलेल्या श्री अंबादेवी व श्री एकविरादेवी च्या शारदीय नवरात्र उत्सवाची होम हवन करून सांगता करण्यात आली. सोबतच अनेक सार्वजनिक नवरात्र दुर्गोत्सव मंडळांमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.आज सिमोलंघनासाठीनिघालेल्या संयुक्त पालखी यात्रेत हजारो भक्तांची उपस्थिती होती.

विदर्भवासियांची कुलस्वामीनी असलेल्या श्री अंबादेवी व श्री एकविरादेवी मंदीर संस्थान येथे आश्विन शुध्द प्रतिपदेपासुन सुरूवात झाली होती. गेली नऊ दिवस आदी शक्ती आदीमायेची मनोभावे पुजा अर्चा करण्यात आली. शुक्रवार अष्टमी व नवमीच्या निमित्ताने श्री अंबादेवी व श्री एकविरादेवी मंदीर संस्थान मध्ये दुपारपासुन होम हवनाला सुरूवात झाली. श्री अंबादेवी मंदीर संस्थानमध्ये सचिवव्दय रविंद्र कर्वे आणि अ‍ॅड. दिपक श्रीमाळी यांनी सपत्निक नवमीच्या होम होम हवनामध्ये सहभाग घेतला. तर श्री एकविरा देवी संस्थानमध्ये मंडळाचे सचिव चंद्रशेखर कुळकर्णी व विश्वस्त चंद्रशेखर यांनी सपत्निक होम हवनाचा विधी पार पडला.

सायंकाळी दोन्ही देवीच्या संस्थानमध्ये पार पडलेल्यानवमीच्या होमामध्ये पुर्णाहुती टाकण्यात आली. त्यानंतर देवीची महाआरती पार पडली. महाआरतीनंतर महाप्रसादाचे देखील आयोजन मंदीरामध्ये करण्यात आले होते.अष्टमी व नवमीच्या निमित्ताने भाविकांनी मोठ्या संख्येने श्री अंबादेवी व एकविरादेवी मंदीरात भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. त्यामुळे मंदीर परिसरात भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.





### आज दोन्ही देवींची संयुक्त पालखी यात्रा

दसऱ्याच्या पर्वावर शनिवार दि. १३ आक्टोंबर रोजी दुपारी ४ वाजता श्री अंबादेवी व श्री एकविरा देवीची संयुक्त सिम्मोल्लंघन पालखी यात्रा काढण्यात येणार आहे. ही पालखीयात्रा पालखी मार्गाने मार्गक्रमण करीत श्री ब्रिज ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय पसिरात असलेल्या नियोजीत स्थळी पोहचेल. त्या ठिकाणी देवीला सोने अर्पण करून ही पालाखी परत मंदीरामध्ये येईल.



# दुर्गादेवी विसर्जन दरम्यान लेजर लाईटवर बंदी घाला

## गावकऱ्यांची शांतता समितीमध्ये मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव पेठ-** डीजे वाहनांवर असलेल्या लेजर लाईटचे नागरिकांवर होत असलेले दुष्परिणाम बघता दुर्गादेवी विसर्जनवेळी लेजर लाईट वर पूर्णपणे बंदी घालावी अशी मागणी नांदगाव पेठ येथील नागरिकांनी शांतता समितीमध्ये केली. यावेळी नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी तातडीने या मागणीसंदर्भात पत्र काढून आयोजकांना या गंभीर बाबीबाबत सूचना देण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. शुक्रवारी नांदगाव पेठ पोलीस स्टेशनमध्ये दुर्गादेवी विसर्जन तसेच येणाऱ्या सणासुदी संदर्भात शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये विविध विषयांवर समिती सदस्यांनी चर्चा केली.गणेश विसर्जनवेळी लेजर लाईट च्या प्रकाशामुळे तसेच डीजेच्या आवाजाने अनेकांना भुरळ आल्याचा तसेच डोळ्यांवर परिणाम झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या त्यामुळे दुर्गा विसर्जन दरम्यान लेजर लाईट वर प्रामुख्याने बंदी घालावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. सणासुदीच्या काळात तसेच दुर्गाविसर्जन दरम्यान गावकऱ्यांनी शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी यावेळी केले.या बैठकीला शांतता समितीचे सदस्य एड. निलेश मरोडकर,पत्रकार मंगेश तायडे,संजय इंगळे,ग्रा.पं. सदस्य बाळासाहेब राऊत, किशोर नागपुरे,अरुण राऊत,राजेंद्र तुळे,सिद्धार्थ राऊत,नंदेश्वर ढोके, सुमित कांबळे, बाबाराव गायकवाड,संदेश गायकवाड, निखिल पडोळे, मो.राजीक पटेल ,शे. अजमत शे. हैदर,दिनकर सुंदरकर,राजन देशमुख,अझहर खा सफदर खा,निलेश सरोदे आदी उपस्थित होते.

# अमरावती शहरात ऑनलाईन शस्त्र खरेदीस प्रतिबंध

## पोलीस आयुक्तांचा आदेश : गुन्ह्यात चायना चाकुचा वापर वाढल्याने कंपनींनाही नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२ अमरावती**

शहरात ऑनलाईन शस्त्र खरेदीस प्रतिबंध घालण्यात आला आहे. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी ११ ऑक्टोबर रोजी तो आदेश काढला असून, तो पुढील ६० दिवसांकरीता लागू असेल. शहरात अलिकडे झालेल्या खुनाच्या सलग तीन घटनांमध्ये चायना चाकू वापरला गेला. त्यापुर्वी राजापेठ हद्दीत सलग झालेल्या दोन खुनात देखील चायना चाकू वापरला गेला. त्यापाश्वभूमिवर तो प्रतिबंध आदेश काढण्यात आला आहे.अलिकडे फ्लिपकार्ट, मेझॉन, शॉपक्लुज डॉट कॉम या कंपन्या आपल्या ई कॉमर्स प्लेटफार्महून धारधार शस्त्रे, जी गुन्हयांमध्ये वापरले जाऊ शकतात, अशा शस्त्रांची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले. त्याला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ प्रमाणे आदेश पारीत केला आहे. या आदेशान्वये फ्लिपकार्ट, मेझॉन,



शॉपक्लुज डॉट कॉम या ई-कॉमर्स प्लेटफॉर्महून तिक्ष्ण धार असलेले प्राणघातक शस्त्र ज्याच्या पात्याची लांबी नऊ इंचापेक्षा जास्त किंवा ज्याच्या पात्याची रुंदी २ इंचापेक्षा जास्त असेल, ज्याचे बाळगणे हे भारतीय हत्यार कायदा कलम ४ सहकलम २५ अन्वये दखलपात्र गुन्हा होत असल्याने अशा शस्त्र विक्रीवर अमरावती शहरात बंदी घालण्यात आली आहे.

**यांची मागितली माहिती**

ज्यांची लांबी नऊ इंचापेक्षा कमी व रुंदी दोन इंचापेक्षा कमी असलेल्या शस्त्रांची ऑनलाइन खरेदी करण्या-या अमरावती शहरातील ग्राहकांची विस्तृत तपशीलासह माहिती अमरावती शहर पोलिसांना वेळोवेळी पुरविण्याबाबत देखील संबंधित इ कॉमर्स कंपन्यांना आदेशित करण्यात आले आहे.

### शस्त्रखरेदी करणा-यांची माहिती मागवली

ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून शस्त्रखरेदी करणा-या शहरातील व्यक्तीचे नाव, पत्ता, शस्त्राचा प्रकार, फोटो व इतर आवश्यक माहिती मिळवून ती सादर करण्याचे निर्देश सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आले आहेत. शहरातील काही गंभीर गुन्ह्यातील आरोपींनी ऑनलाईन शस्त्र विकत घेतल्याचे आढळले. अशा शस्त्र विक्रीमुळे शहरात गुन्हेगारांना घरपोच शस्त्र उपलब्ध होत असून, गुन्हेगारीस पाठबळ मिळू शकते. त्यामुळे हा आदेश पोलीस आयुक्तांकडून जारी करण्यात आला.सर्व ऑनलाईन शस्त्रांची विक्री करणा-या कंपन्यांना नोटीस देण्यात आली आहे. शहरात ऑनलाईन शस्त्र खरेदीस प्रतिबंध घालण्यात आला आहे. आयुक्तालयातील दहाही पोलीस ठाण्याच्या हद्दीत तो आदेश लागू राहिल. तसेच पोलिसांतर्फे अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरूध्द मोहिम हाती घेण्यात आली आहे. **- नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त**






## काँग्रेसच्या 'पंजा' ला बांधलेला वाघ अन् शिंदेंनी सोडला बाण

# 'दसरा मेळावा' टीझरमध्ये ठाकरे निशाण्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ मुंबई–** शिवसेनेतील फुटीनंतर मुंबई विजयादशमीला दोन दसरा मेळावे सुरू झाले आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा मेळावा शिवाजी पार्क मैदानात होत असून, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा मेळावा आझाद मैदानावर होत आहे. या मेळाव्याची तयारी सुरू असून, शिंदेंच्या शिवसेनेने टीझरमधून पहिला वार ठाकरेंच्या शिवसेनेवर केला आहे.

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्याची परंपरा सुरू केली. ही परंपरा पुढेही कायम आहे. मात्र, शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर एकाच दिवशी दोन शिवसेना मेळावे होत आहेत. शिवसेनेतील फुटीनंतर शिवाजी पार्क मैदानावरून दोन्ही शिवसेना आमने–सामने आल्या होत्या.काँग्रेसच्या पंजाला बांधला वाघ; व्यंगचित्राचा वापर करून उद्धव सेनेवर जोरदार टीका

मराठी आपला श्वास,
हिंदुत्व आपला प्राण
चलो आझाद मैदान...

वाजत गाजत या, गुलाल उधळत याअसे म्हणत




शिवसेनेने एक टीझर शेअर केला आहे. टीझरमध्ये सुरूवातीला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा दिसतो. त्यानंतर शिवसेना नावाचा वाघ दिसतोय. वाघाच्या गळ्यात पट्टा असून, तो पट्टा उद्धव ठाकरेंनी काँग्रेसच्या पंजाला बांधला आहे, असे दाखवण्यात आले आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे धनुष्यबाण घेऊन येतात आणि तो पट्टा तोडतात. नंतर शिवसेना नावाचा वाघ त्यांना मिठी मारतो.आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यंदाचा शिंदे सेनेचा दसरा मेळावा विशेष असणार आहे. शिवसेनेचा वाघ उद्धव सेनेच्या काळात बांधला गेला होता, त्याला एकनाथ शिंदेनी सोडवला अशा थीमलाईनवर हा टिझर बनवला असून शिंदे सेनेकडून पुन्हा एकदा दसरा मेळाव्यात हिंदुत्व हाच प्रमुख मुद्दा असणार असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

# हर्षवर्धन पाटलांच्या प्रवेशाने शरद पवार गटात नाराजी?

## इंदापूरच्या कार्यकर्त्यांनी उमेदवार बदलण्याची केली मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ इंदापूर–** विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला काही दिवसातच सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर नेत्यांच्या पक्षांतराला सुरुवात झाली. काही दिवसापूर्वी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भाजपामधून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. दरम्यान, आता इंदापूरातील राष्ट्रवादीतील काही कार्यकर्त्यांनी पाटील यांच्या प्रवेशावरुन नाराजी व्यक्त केली आहे. आज इंदापूरात प्रवीण माने यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. यावेळी त्यांनी नाराजी व्यक्त केली.

हर्षवर्धन पाटील यांनी प्रवेश केल्यानंतर इंदापूरातील तीन नेत्यांनी विरोध केला. आज या नेत्यांनी इंदापूरात परिवर्तन मेळावा घेतला. यावेळी प्रवीण माने यांचीही उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रवीण माने म्हणाले, आज मेळाव्यात प्रमुख ज्येष्ठ नेते बोलले आहेत. लोकांचा मोठा प्रतिसाद आहे. प्रतिसाद असल्यानंतर जनतेच्याविरोधात जाऊन चालत नाही. शेवटी जनता सांगेल तोच निर्णय घ्यावा लागतो. आजपर्यंतच्या इतिहासात मी एवढी मोठी सभा इंदापूर शहरात बघितली नव्हती. मोठे नेते कोण नसतानाही एवढं उत्साहाच वातावरण होतं. आदरणीय शरद पवार साहेब आमचे दैवत होते आणि राहणार आहेत. साहेबांना सल्ला देण्याएवढा मी मोठा कार्यकर्ता नाही.मी छोटा कार्यकर्ता आहे, असंही प्रवीण माने म्हणाले. येणारी विधानसभा पक्षाच्या विरोधात लढवायची का? याचा निर्णय आप्पासाहेब जगदाळे, भरतशेठ शहा हे ज्येष्ठ मिळून निर्णय घेतील. यानंतर हा निर्णय होईल, असंही प्रवीण माने म्हणाले. इंदापूरात हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्याने शरद पवार गटातील नाराज नेत्यांनी आज इंदापूरातील मार्केट यार्डच्या मैदानात मेळावा घेतला. पाटील यांना उमेदवारी झाल्यानंतर प्रवीण माने, आप्पासाहेब जगदाळे, आणि भरत शहा यांमी नाराजी व्यक्त केली. या तिनही नेत्यांनी हर्षवर्धन पाटील यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी करणार असल्याचे बोलले जात आहे. यामुळे आता हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

# अपरिहार्य कारणाशिवाय रजा मंजूर करू नका

## विधानसभा निवडणूक तयारी : कार्यालयांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
***दि.१२अकोला–*** *विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून विविध पथकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण वर्ग व इतर पूर्वतयारी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी अधिकारी व कर्मचा–यांच्या दीर्घ रजा वैद्यकीय किंवा अपरिहार्य कारणाशिवाय मंजूर करू नयेत, अशा स्पष्ट सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी अजित कुंभार यांनी दिल्या आहेत.सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शाळा–महाविद्यालये आदींनी अधिकारी–कर्मचारी यांच्या अपरिहार्य कारण किंवा वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त कुठलीही अर्जित, दीर्घ मुदतीची रजा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर करू नये. कर्मचारी उपलब्ध नसल्याने निवडणूक कामकाजात व्यत्यय आल्यास सर्वस्वी जबाबदारी कार्यालयप्रमुखाची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.*

# आरोग्यविषयक कार्यक्रमाच्या जनजागृतीमध्ये महाविद्यालयांनी सहभाग वाढवावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती,** राष्ट्रीय सेवा योजना तसेच रेड रिबन क्लब यांच्या माध्यमातून आरोग्याच्या योजना ग्रामीण भागात पोहचविण्याचे उद्दिष्ट प्रत्येक महाविद्यालयांनी ठेवावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकरी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. अजय साखरे, क्षयरोग अधिकारी डॉ. रमेश बनसोड, पीसीपीएनडीटीच्या प्रणिता भाकरे, जिल्हा सल्लागार डॉ. मंगेश गुजर , समर्पण ट्रस्टचे पवन निंभोरकर तसेच सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार म्हणाले, एड्सबाबत विविध स्तरावरून जनजागृती करण्यात येत आहे. १५ मे व १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत इन्डेक्स टेस्टिंग मोहिम जिल्ह्यात राबविण्यात आली. यामध्ये जे एचआयव्ही संक्रमित आहेत, त्यांच्या संक्रमणाची उगमस्थान शोधण्यासाठी ही मोहिम राबविण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील संक्रमित व्यक्तीच्या संलंग्नित व्यक्तींची तपासणी करण्यात आली. त्यात ४२ एचआयव्ही संक्रमित आढळले. या सर्वांवर औषधोपचार सुरू करण्यात आले आहे. महाविद्यालयीन स्तरावरून विविध पथनाट्य, कार्यक्रम, योजना यांच्या माध्यमातून एड्सबाबत जनजागृती करण्यात यावी.

लिंग परीक्षण कायद्याविषयी ग्रामीण भागात जनजागृती करण्यावर भर द्यावा.यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सहकार्याने सोनोग्राफी केंद्रांना अचानक भेटी देऊन तपासणी करावी. या कायद्याची व्याप्ती वाढवण्यासाठी महिला व बालकल्याण विभाग तसेच अन्य संबंधित विभागांना समाविष्ट करून ग्रामीण भागात विशेष जनजागृती करावी, असे निर्देश आरोग्य विभागाला दिले. 'तंबाखूमुक्त गाव' भविष्यात करण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी पवन निंभोरकर यांनी तृतीयपंथीयांच्या येणाऱ्या अडचणी नमूद केल्या. तृतीयपंथीयांकडून त्यांच्या अडचणींबाबत प्रस्ताव मागविण्यात आले असून संबंधित विभागांना त्यावर कार्यवाही करण्याची सूचना श्री. कटियार यांनी दिल्या.

# दुपारी एकला चेनस्नॅचिंग, तासाभरानंतर चेनस्नॅचर्स अटकेत

## गुन्हे शाखेच्या युनिट एकची कारवाई : एक विधीसंघर्षग्रस्त बालकही ताब्यात



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१२नागपूर** – पतीसह दुचाकीवरून जाणाऱ्या एका महिलेचे मंगळसूत्र हिसकावून पसार झालेल्या दोन भामट्यांना घटनेनंतर अवघ्या दोन तासांतच गुन्हे शाखेच्या युनिट एकने अटक केली. सोबतच एका विधीसंघर्षग्रस्त बालकालाही ताब्यात घेण्यात आले. ही घटना १० ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील रहाटगाव परिसरात घडली होती. अभिषेक उर्फ टोबो आनंदीलाल साहू (२२, रा. संतोषीनगर, अमरावती) व इमरान खान बिसमिल्ला खान (२५, रा. आझादनगर, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या चेनस्नॅचर्सची नावे आहेत. गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धार्थनगर येथील रहिवासी प्रतिभा अरुण आठवले (४५) या गुरुवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास पतीसह दुचाकीने रहाटगाव येथून जात होत्या. त्यावेळी रस्त्यावर दुचाकी घेऊन तीन तरुण उभे होते. त्यातील एकाने प्रतिभा आठवले यांना पत्ता विचारला. त्याचवेळी दुसऱ्याने त्यांच्या गळ्यातील ३१ हजार रुपयांचे मंगळसूत्र जबरीने हिसकाविले. त्यानंतर तिनही लुटारू दुचाकीने तेथून पळून गेले. घटनेनंतर प्रतिभा आठवले यांनी नांदगाव पेठ ठाण्यात तक्रार दाखल केली. गुन्हे शाखेच्या युनिट एकनेही घटनास्थळाला भेट देऊन गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. तपासात या गुन्ह्यात रेकॉर्डवरील गुन्हेगार अभिषेक उर्फ टोबो याचा हात असल्याचे समोर आल्यावर त्याला विलासनगर भागातून ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीत त्याने हा गुन्हा इमरान खान व विधीसंघर्षग्रस्त बालकासोबत मिळून केल्याची कबुली दिली. त्यानुसार इमरान खानला अटक करून विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले.

### मंगळसूत्र, दुचाकी जप्त

दोन आरोपींच्या ताब्यातून सोन्याचे मंगळसूत्र व दुचाकी असा एकूण १ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेच्या युनिट एकचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, अलीमउद्दीन खतीब, नाझीमउद्दीन सय्यद, विकास गुडदे, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, अमोल मनोहर, रोशन माहुरे, किशोर खेंगरे, सायबरचे साहाय्यक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार, निखिल माहुरे, अनिकेत वानखडे यांनी केली.

# महिलांसाठी दिलासादायक बातमी: 'लाडकी बहीण'साठी अर्ज करण्याची मुदत वाढवली, १५ ऑक्टोबर शेवटची तारीख!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ मुंबई–** सरकारने राज्यभरातील महिलांना दिलासा देत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी आता लाभार्थी महिलांना १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यामुळे ज्या महिलांनी अद्याप सदर योजनेसाठी अर्ज दाखल केले नाहीत त्यांना अर्ज दाखल करण्यासाठी आणखी एक संधी मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अजूनही अर्ज न करू शकलेल्या महिलांसाठी सरकारने आणखी चार दिवसांची मुदतवाढ दिली आहे. १५ ऑक्टोबर रोजी रात्री १२ पर्यंत महिलांना या योजनेसाठी अर्ज करता येणार आहेत. मात्र हे अर्ज अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातूनच दाखल करावेत, अशी अट सरकारने ठेवली आहे.

दरम्यान, सरकारने राज्यात या योजनेची अंमलबजावणी सुरू केल्यापासून अनेकदा अर्ज करण्याची मुदत वाढवून दिली आहे. मात्र आता विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागणार असल्याने लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज दाखल करण्याची १५ ऑक्टोबर ही शेवटची संधी ठरण्याची शक्यता आहे.


### योजना कधीपर्यंत सुरु राहणार?

विरोधी पक्षांकडून लाडकी बहीण योजनेबाबत वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. लाडकी बहीण योजना कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या योजनेसाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगड येथील वचनपूर्ती मेळाव्यात दिली होती. तसेच सद्यस्थितीत असणारी दरमहा १ हजार ५०० रुपयांची रक्कम वाढवत जाऊन टप्प्याटप्प्याने ही रक्कम ३ हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

# महायुतीमध्ये उमेदवारांचा निर्णय जातीच्या आधारावर नाही तर गुणवत्ता आणि कार्यक्षमतेच्या आधारावर – प्रदेशाध्यक्ष बावनकुळे


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर –** महायुतीमध्ये उमेदवारांचा निर्णय जातीच्या आधारावर होणार नाही. तर गुणवत्ता आणि कार्यक्षमतेच्या आधारावर उमेदवारांचा विचार केला जाणार असल्याचे मत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. भारतीय जनता पक्षाने कधीही जात, धर्माचे राजकारण केले नाही आणि करणार नाही. आमची हिंदुत्वाची भूमिका प्रखर आहे आणि महत्त्वाची आहे. कोणत्याही परिस्थितीत हिंदुत्वाशी तडजोड करणार नाही. या देशात राहून बांगलादेश व पाकिस्तानचे समर्थन करणाऱ्यांशी आम्ही कधीही जुळवून घेणार नाही. या देशाच्या प्रत्येक हिंदू बांधवाशी आमची बांधिलकी असल्याचे बावनकुळे म्हणाले.मध्यप्रदेशात लाडकी बहीण योजना बंद झाल्याचे संजय राऊत म्हणाले. पण, ते खोटे बोलत आहेत. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी एक कोटी तीस लाख महिलांना योजना सुरळीत सुरू असल्याची माहिती दिली. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असून आमच्या काळात योजना सुरू झाली. पुढे सुरूच राहणार आहे. मात्र जिथे जिथे काँग्रेसचे सरकार आले महिलांच्या



योजनांसह अनेक योजना योजना बंद केल्या आहेत. राऊत यांनी काँग्रेस शासित राज्य कर्नाटक, हिमाचल, तेलंगणा बद्दल बोलले पाहिजे. त्यांच्या विरोधात मध्य प्रदेशमध्ये गुन्हा दाखल झाला असल्याचे बावनकुळे म्हणाले. महाविकास आघाडीचा खोटारडेपणा हा महिलांना उदध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही, असेही बावनकुळे म्हणाले. राहुल गांधी खटाखट निधी घ्या असे म्हणाले होते. ते आता खोटे निघाले. आरक्षण बद्दलही राहुल गांधी खोटे बोलले होते. त्यामुळे नाना पटोले यांनी वास्तविकतेचे भान ठेवावे. त्यांना मुंगेरीलाल के हसीन स्वप्न पडत आहे अशी टीका त्यांनी केली.उद्धव ठाकरे यांना भाजपसोबत असताना मानसन्मान होता मात्र आता आघाडीमध्ये त्यांचे काय हाल होत आहेत, हे जनता पहात आहे. शरद पवारांनी त्यांची काय परिस्थिती केली आहे. आम्ही मान सन्मान दिला मात्र आघाडीसोबत जाऊन त्यांनी पक्षाची माती केली आहे.

# रिपाइंला ८ ते १० जागा हव्यात; निवडणूक आमच्याच चिन्हावर लढणार: रामदास आठवले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर–** भाजपसोबत रिपाइं जुळली तेव्हाच महायुती तयार झाली. सध्या महायुतीतील तिन्ही मोठे पक्ष जागेसाठी भांडत आहेत. परंतु, अद्याप जागेसंदर्भात आमच्यासोबत कोणतीही चर्चा झाली नाही. रिपाइंला ८ ते १० जागा हव्या आहेत. याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे रिपाइंचे (आठवले) राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शुक्रवारी पत्रपरिषदेत सांगितले.

आठवले म्हणाले, मागील विधानसभा निवडणुकीत भाजपने पाच जागा दिल्या होत्या. परंतु चिन्ह भाजपचे होते. उमेदवारही त्यांचे होते. यंदा आम्ही आमच्याच चिन्हावर लढू. दोन राज्यात आमचे आमदार आहेत. आणखी दोन राज्यांत उमेदवार आल्यास राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळेल.

महायुतीतील तीनही पक्षांनी त्यांच्या कोट्यातील तीन–तीन जागा द्याव्यात.रिपब्लिकन पक्षाची स्थापना नागपुरात झाली. नऊ खासदार या रिपब्लिकन पक्षाचे निवडून आले होते. परंतु, नंतर गटबाजीमुळे पक्षात फूट पडली. नेत्यांमधील बेकीमुळे रिपब्लिकन पक्षाचे नुकसान झाले, अशी कबुलीही आठवले यांनी दिली.

# मोरबागमध्ये संत गाडगेबाबांच्या नावाने बोगस दवाखाना

## महापालिकेच्या आरोग्य विभागाने लावले टाळे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मोरबाग परिसरात एका भाड्याच्या खोलीत 'श्री संत गाडगेबाबा रुग्णालय' नावाने बोगस दवाखाना सुरू असल्याची तक्रार महापालिकेच्या आरोग्य विभागाला प्राप्त झाली होती. त्यानुसार महापालिकेच्या पथकाने तपासणी केली असता, सदर दवाखान्याचे कोणतेही अधिकृत कागदपत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्या बोगस दवाखान्याला शनिवार, १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सील लावण्यात आले.

इंडियन मेडिकल असोसिशन व स्थानिक नागरिकांनी याबाबत तक्रारीकेल्या होत्या. त्यानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या नेतृत्वात आरोग्य विभागाच्या पथकाने ८ ऑक्टोबर रोजी तपासणी केली. मुंबई नर्सिंग होम कायद्यानुसार प्रत्येक खासगी रुग्णालयाची नोंदणी करणे, बायोमेडिकल वेस्टची परवानगी घेणे, दवाखान्यात दर्शनीय ठिकाणी संबंधित डॉक्टरांचे प्रमाणपत्र वा नोंदणी प्रमाणपत्र लावणे बंधनकारक आहे. या संत गाडगेबाबा रुग्णालयात बाल रोग तज्ज्ञ, नेत्र रोग तज्ज्ञ, स्त्री प्रसूती तज्ज्ञांच्या माध्यमातून उपचार केले जात असल्याचे सांगण्यात येत असले, तरी तिथे कोणत्याही नियमांचे पालन करण्यात आले नसल्याचे आरोग्य पथकाच्या तपासणीतआढळून आले. त्यामुळे रुग्णालयात उपस्थित कर्मचाऱ्यांना त्यावेळी डॉक्टरांचे शैक्षणिक कागदपत्रे, तसेच रुग्णालय चालवण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाची परवानगी, आदी दस्तऐवज सादर करण्याची सूचना करण्यात आली होती. त्यानंतरही रुग्णालयाकडून तसा कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शनिवारी सदर कारवाई करण्यात आली. आश्चर्याची वाव म्हणजे शनिवारी कारवाई करतेवेळीसुद्धा येथे कोणताही डॉक्टर वा जबाबदार प्रतिनिधी उपस्थित नव्हता. तिथे केवळ सदर जागेचे मालक, एकरिसेप्शनिस्ट व एक कर्मचारी उपस्थित होता. तसेच पॅरामेडिकल ओप्थलमेट्री कोर्स केलेला एक कर्मचारी रुग्णांकडून १५० रुपये शुल्क घेऊन डोळ्यांची तपासणी करीत होता. तसेच तो रुग्णांना चष्मा नंबर व आय ड्रॉपही लिहून देत असल्याची गंभीर बाब यावेळी उघड झाली. या दवाखान्याचा मूळ डॉक्टर कोण आहे, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. दरम्यान, या कारवाई पथकात मसानगंज येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अल्मास खान, मुख्यालयातील डॉ. रुपेश खडसे व शहर कोतवाली ठाण्यातील पोलीस कर्मचारी यांचा समावेश होता.

> रुग्णालयातील सर्व डॉक्टरांचे कागदपत्रे २४ तासांत उपलब्ध करण्याचे आदेश देण्यात आले असून, दवाखान्याच्या इमारतीला तशी नोटीस चिटकविण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पूर्व परवानगीशिवाय ववाखाना सुरू केल्यास कठोर कारवाईचाही इशारा देण्यात आला आहे. महापालिका क्षेत्रात कुठेही भोंदू किंवा अनधिकृतरित्या दवाखाना सुरू असल्यास नागरिकांनी तक्रार करावी.
> **डॉ. विशाल काळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महापालिका**

# श्री अंबादेवी संस्थान येथे सहज योग ज्ञान विज्ञान प्रदर्शनी व आत्मसाक्षात्काराचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

शारदीय नवरात्री महोत्सवाच्या निमित्ताने अंबा नगरीचे पवित्र तीर्थस्थान असलेल्या श्री अंबादेवी मंदिर संस्थान येथे दर्शनाकरिता येणाऱ्या भाविक भक्तांकरिता श्री अंबादेवी मंदिर परिसरात गौशाला येथे प.पू.श्री माताजी निर्मला देवी प्रणित सहजयोग ध्यान ज्ञान–विज्ञान प्रदर्शनी व कुंडलिनी जागृती आत्मसाक्षात्काराच्या अभियानाचे आयोजन दिनांक ९ ,१० ,११ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८.०० ते रात्री ९.०० दरम्यान करण्यात आले. या तीन दिवसीय अभियानामध्ये जवळपास ५००० भाविक भक्तांनी आत्मसाक्षात्काराची अनुभूती घेतली.अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी सर्व जाती धर्मातील लोकांना शाश्वत सुख, समाधान ,आरोग्य, प्रेम – शांती व आनंद मिळवून देणारा व आपले संपूर्ण जीवन बदलून टाकणाऱ्या परमेश्वरी शक्तीशी जोडून देणारा एकमेव सहज व सुलभ मार्ग म्हणजे प.पू. श्री माताजी निर्मला देवी प्रणित सहजयोग ध्यान. सहजयोग ही एक संपूर्ण शास्त्रोक्त ध्यान पद्धती असून या ध्यानाद्वारे मनुष्यातील कुंडलिनी शक्तीच्या जागृतीने मानवास आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो. नियमितपणे ध्यान केल्याने आंतरिक सुख– शांती व समाधान प्राप्त होते .पालक ,शिक्षक, व्यावसायिक, शेतकरी, विद्यार्थी व इतरांसाठी सहजयोग ध्यान कसे लाभदायक ठरते याविषयी अमरावती जिल्हा समन्वयक श्री वैभव घुसे यांनी माहिती दिली. या अभियानाच्या यशस्वीते करिता माजी जिल्हा समन्वयक श्रीमती सिंधुताई पांढरीकर , प्रचार प्रसार प्रमुख श्री नितीन जवंजाळे, डॉ. सुभाष उधवानी, श्री चेतन देशमुख,मनोज खोपे, जिल्हा युवा समन्वयक भावेश पोपटानी, सर्व सब सेंटर समन्वयक, सर्व सहजयोगी बंधू भगिनी युवाशक्तीआदींनी परिश्रम घेतले.अमरावती शहरांमध्ये साप्ताहिक मुख्य ध्यान केंद्र दर रविवारी सकाळी ८.३० ते ९.३० या वेळेत श्री निर्मल धाम, सिपना इंजीनियरिंग कॉलेज जवळ, बडनेरा रोड ,अमरावती येथे विनामूल्य आयोजित केले जाते .सहजयोग ध्यानाचे विनामूल्य कार्यक्रम घेण्यासाठी सहजयोग ध्यान केंद्र अमरावती ९०९६६८२०२३ येथे संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले.

# पंकजा मुंडे यांच्याकडून महाराष्ट्र दौऱ्याची घोषणा; सावरगावात तुफान गर्दी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२सावरगाव**

दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे यंदाही दसऱ्याच्या दिवशी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा बीडमधील भगवान गडावर दसरा मेळावा झाला. या मेळाव्यात त्यांनी शेरोशायरी करत धडाकेबाज भाषणही केलं. या भाषणात पंकजा यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. त्यांच्या सभेसाठी तूफन गर्दी झाली होती. मी महाराष्ट्राची वाघीण आहे. आता मी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात दौऱ्याला येणार आहे. आपल्याला आपला डाव खेळायचा आहे, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र दौऱ्याची धडाक्यात घोषण केली.

माझ्या दसऱ्याला मी कुणालाही निमंत्रण देत नाही, पण लोक आपसूक येतात. या मेळाव्याला १८ पगड जातीचे लोक आलेत. नाशिकहून, नगरहून आले का, बुलढाण्याहून आले आहेत. गंगाखेड, जिंतूर परभणी नांदेड, अकोला अमरावती पुणे पिंपरी चिंचवड कुठून कुठून लोक आले आहेत आज सभेला. सगळ्या राज्यभरातून बांधव आलेत. मी दरवर्षी तुम्हाला साष्टांग दंडवत घालते. कारण माझ्या बापाने मरताना माझ्या झोळीत तुमची जबाबदारी टाकली आहे. तुम्ही मला जिंकवलं, मला इज्जत दिली. माझा पराभव झाल्यावर सर्वात अधिक इज्जत दिली. आता मी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात दौऱ्याला येणार आहे. आपल्याला आपला डाव खेळायचा आहे, असे पंकजा मुंडे यांनी जाहीर केलं. परळीतून आम्ही धनु भाऊला तर निवडून देणारच आहोत. पण आता सगळीकडे मी येणार आहे. आमच्या लोकांना त्रास दिल्यास त्याचा हिसाब घेतल्याशिवाय राहणार नाही असा इशारा पंकजा यांनी दिला.

# राष्ट्रीय जनजाती आयोगाच्या चमूने आदिवासींचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

दिल्ली येथील राष्ट्रीय जनजाती आयोगाच्या चमूने ७ व ८ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याचा दौरा केला. यात आदिवासींचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या. यावेळी शासकीय शाळा, वसतिगृहांना भेटी देताना आदिवासी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. आदिवासी विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षण हे मजबूत असण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्याचे निर्देश यंत्रणेला देण्यात आले. दरम्यान 'एक पेड मेरे मां के नाम'अंतर्गत वृक्षलागवडीचा उपक्रम राबविण्यात आला. मोर्शी, धारणी व अमरावती येथे या चमूने आदिवासींसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला, हे विशेष. या चमूत राष्ट्रीय जनजाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य व सदस्य राजीव सक्सेना यांचा समावेश होता. त्यांच्यासमवेत अध्यक्षांचे स्वीय सचिव अंकित सेन, वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे, वरिष्ठ अन्वेषक अमृतलाल प्रजापती आदी दौऱ्यावर होते. जिल्हा आरोग्य विभाग व तालुका आरोग्य विभागाच्यावतीने मोर्शी येथील शासकीय आयटीआयमध्ये आयोजित सिकलसेल तपासणी शिबिराचे उद्घाटन आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आदिवासी विकास विभाग अमरावतीचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी व धारणी येथील प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



दरम्यान, आयोगाने वनरक्षक समिती, वनाधिकारी हितग्राही समिती, पेसा समिती, स्थानिक आदिवासी जनता व लोकप्रतिनिधींसोबत जनसंवाद साधला. त्यानंतर धारणी, चिखलदरा व मोर्शी परिसरातून आलेल्या वनरक्षा समितीचे सदस्य, वनहितग्राही सदस्य, पेसा समिती सदस्य, आदिवासी तथा लोकप्रतिनिधींसोबत आयोगाने संवाद साधला. येथील विमलाबाई देशमुख सभागृहात आदिवासी वसतिगृहाचे विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या युवा संवाद कार्यक्रमातून राष्ट्रीय जनजाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांनी मुलांच्या मनातील भावना जाणून घेतल्या. यावेळी अमरावतीचे एटीसी जितेंद्र चौधरी, धारणीच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांची उपस्थिती होती. गोवर्धन मुंडे प्रास्ताविक तर जवाहर गाढवे यांनी संचालन केले. यावेळी उपायुक्त जागृती कुमरे, वरिष्ठ संशोधन अधिकारी प्रीती तेलखेडे, पुसद येथील प्रकल्प अधिकारी अमोल मेंतकर, धारणीचे सहायक प्रकल्प अधिकारी राहुल ठोंबरे आदी उपस्थित होते.

# अजितदादा आणि प्रकाश आंबेडकरांनी एकत्र यावं, अमोल मिटकरी यांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अकोला :**

राज्याच्या सध्या आगामी विधानसभा निवडणुकांचे वारे वाहत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरु आहे. येत्या काही दिवसांतच विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू शकते. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनी राजकीयदृष्ट्या एकत्र यावं, असं मत राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केलं आहे.



अजितदादा आणि प्रकाश आंबेडकरांनी आगामी विधानसभा निवडणुकीत एकत्र यावं. राष्ट्रवादीसोबत प्रकाश आंबेडकर आले तर त्याचा विशेष आनंदही आम्हाला होईल, असं अमोल मिटकरी यांनी म्हटलं आहे. तसंच, प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रक्ताचे आणि वैचारिक वारसदार, तर अजित पवार हे शिव–शाहू फुले–आंबेडकरांच्या विचारांचे वैचारिक वारसदार असल्याचा आमदार अमोल मिटकरी यांनी म्हटलं आहे.

या दोन्ही नेत्यांनी एकत्र यावं, यासाठी मध्यंतरी आपण प्रयत्न केले होते. मात्र त्याला दोन्हीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यानं ते प्रयत्न थांबवले होते. आता आपण शेवटच्या श्वासापर्यंत हे दोन्ही नेते एकत्र येण्यासाठीचे प्रयत्न सोडणार नाही, असं अमोल मिटकरी म्हणाले. अमोल मिटकरी यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगल्या आहेत. तसेच, १३ ऑक्टोबर रोजी अकोला प्रकाश आंबेडकरांच्या उपस्थित अकोल्यात होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या स्वागतासाठी अमोल मिटकरी आणि प्रकाश आंबेडकरांचे एकत्रित फोटो असलेले बॅनर लागल्यानेही चर्चा रंगली आहे.

एकीकडे महायुतीमध्ये अजित पवार नाराज असल्याच्या चर्चा सुरु असतानाच अमोल मिटकरी यांनी केलेल्या या विधानाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार उठून गेल्याची चर्चा होती. यावर अमोल मिटकरी म्हणाले की, अजित पवार महायुतीमध्ये नाराज नाहीत, जाणीवपूर्वक अशा बातम्या पेरल्या जात आहेत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यामध्ये खटका उडवल्याच्या बातम्या पसरवल्या जात आहेत. खोट्या बातम्या पसरवण्याचे उगमस्थान तुतारी गट तसेच मविआतून आहे.

# भाजीपाल्यांचे दर कडाडलेलेच; शंभर ते १२० रुपये प्रति किलो : बाजारात भाजीपाल्याची पुरेशी आवक होत नसल्याने तेजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

गेल्या महिन्यात झालेल्या जोरदार पावसामुळे भाजीपाल्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. तसेच मध्यंतरीच्या काही दिवसांच्या उघडिपीनंतर आता पुन्हा परतीचा पाऊस अधूनमधून हजेरी लावत असल्याने भाजीपाल्याची पुरेशी आवक बाजारात होत नाही. परिणामी बाजारात भाजीपाल्याचे दर अजूनही कडाडलेलेच असून, लसणाचा ठसकाही कायमच आहे. फुलकोबी, गिलके, दोडके, शेपू, पालक, चवळी,टोमॅटो आदी भाज्यांचे दर शंभर रुपये किलोपर्यंत वाढले आहेत. त्यामुळे स्वयंपाक घराचे बजेट सांभाळावे तरी कसे?, असा प्रश्न सर्वसामान्य, मध्यमवर्गीयांना पडला आहे.

गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासून भाज्यांच्या दरात वाढ सुरू झाली होती. पितृ पक्ष पंधरवड्यात दर चढेच होते. मध्यंतरी पावसामुळे भाजीपाला पिकांचे नुकसान झाल्याने बाजारात आवक कमी होऊन दरात वाढ झाली होती. नवरात्र उत्सवात उपवास करणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय असते. त्यामुळे भाज्यांची मागणी कमी होत असल्याने



दरातही घसरण होते. तथापि, यंदा मात्र असा प्रकार दिसत नसून, भाजीपाल्याची मागणी कमी असतानाही दर चढलेलेच आहेत.किरकोळ भाजीबाजारात वांगी, कारली, ढेमसे, गवार,वाल, शेवगा,सिमला मिरची या पालेभाज्यांचे दरही ८० ते १०० रुपये किलो असेच आहेत. बटाटे आणि भेंडीचे दर तेवढे ग्राहकांच्या आवाक्यात आहेत.

**भेंडी, बटाट्याचे दर 'जैसे–थे'**

आवक कमी असल्याने मागणी नसतानाही जवळपास सर्वच भाज्यांचे दर वाढल्याने गृहिणींसमोर आर्थिक संकट उभे असताना बटाट्याचे दर मात्र मागील अनेक दिवसांपासून ४० ते ५० रुपये प्रति किलोवर स्थिर आहेत. तसेच भेंडीही ४० ते ६० रुपये किलोवर स्थिर आहेत. त्यामुळे गृहिणींना भेंडी आणि बटाट्याचा भाजीसाठी काहीसा आधार होत आहे.

**पालेभाज्याचेदर किलोचे असे**

गवार – १०० ते १२० शेवगा–१०० ते १२० चवळी शेंग–१०० ते १२० कोबी–१०० टोमॅटो–१०० कांदा–६० हिरवी मिरची–६० कारली–८० गिलके–८० ते १०० पालक–८० ते १०० वांगी–६० ते ८० बटाटे–४० ते ५० भेंडी–४० ते ६०

# विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीची दखल ओव्हरलोड वाहनांवर कार्यवाहीचा धडाका

## प्रादेशिक परिवहन विभागाची मध्यरात्री कार्यवाहीदोन वाहनांवर ठोठावला १ लाख १४ हजारांचा दंड


विदर्भ प्रजासत्ताक

खा.अनिल बोंडे यांच्या पत्राला दाखविली केराची टोपली : प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यवाहीत शिथिलता : देवाण घेवाण केल्याचीही चर्चा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव पेठ**

रतन इंडिया मधून ओव्हरलोड राखेची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाने कार्यवाहीचा धडाका सुरू केला असून गुरुवारी मध्यरात्री दोन ओव्हरलोड वाहनांवर १ लाख १४ हजार रुपयांचा दंड ठोठावून दोन्ही वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या परिसरात लावण्यात आली आहे. खा.अनिल बोंडे यांच्या पत्राला केराची टोपली दाखवत प्रादेशिक परिवहन विभागाने कार्यवाही शिथिल केली होती मात्र सर्वात सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक ने वृत्त प्रकाशीत करीत या प्रकरणाला उचलून धरल्यानंतर विभागाने मध्यरात्री ही कार्यवाही केली.

रतन इंडिया औष्णिक ऊर्जा प्रकल्पामधून दररोज चारशे ते पाचशे वाहने महामार्गावरून राखेची वाहतूक केल्या जाते.विशेष म्हणजे रतन इंडियामधून वाहनांमध्ये जेव्हा राख भरण्यात येते तेव्हा ती मोजून न देता अंदाजे वाहनात भरण्यात येते मात्र याचा फटका चालक आणि मालक यांना बसतो.याबाबत खा. अनिल बोंडे यांनी सदर वाहनांमधून ओव्हरलोड वाहतूक थांबवावी तसेच रित्या वाहनांमधून राख उडविणाऱ्या वाहनांवर कार्यवाहीकरण्यातयावी अशी मागणी करण्यात आली होती.मात्र प्रादेशिक परिवहन विभागाने एक दिवस थातूर मातूर कार्यवाहीकरून पत्राला केराची टोपली दाखविली होती व याबाबत वृत्त प्रकाशित करताच दोन दिवसांपासून प्रादेशिक परिवहन विभागाने कार्यवाहीचा धडाका सुरू केला. प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी या वृत्तांची तात्काळ दखल घेत त्यांच्या मार्गदर्शनात मोटर वाहन निरीक्षक प्रताप राऊत, स. मो वा. नि.प्रमोद सरोदे, अंकिता सराफ यांनी बुधवार आणि गुरुवारी दोन्ही दिवस रतन इंडिया जवळ थांबून ही कार्यवाही केली यामध्ये दोन वाहने ओव्हरलोड तसेच कागदपत्रांची पूर्तता न करणारे आढळल्याने त्यांच्यावर मोटार वाहन कायद्यानुसार कार्यवाही करून दोन्ही वाहनांकडुन १ लाख १४ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

### तर राख व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांवर कार्यवाही

याप्रकरणी राख वाहून नेणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करण्याचा प्रकार मुळातच चुकीचा असल्याची भावना ट्रक चालक व मालकांनी व्यक्त केली होती. याविषयी पत्रकारांनी मुद्दा उपस्थित केल्यानंतर मोटर वाहन निरीक्षक प्रताप राऊत यांनी सांगितले की राख व्यवस्थापन करणाऱ्या कंपनिंना तसेच रतन इंडिया यांना संयुक्त पत्र विभागाच्या वतीने देण्यात आले असून यापुढे वाहन ओव्हरलोड असल्यास राख व्यवस्थापन कंपनीवर सुद्धा कार्यवाही करण्यातयेईल असे स्पष्टीकरण प्रताप राऊत यांनी दिले.


# नवनीत राणा यांना सामूहिक अत्याचाराची धमकी; हैदराबादवरून आले पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

माजी खासदार आणि भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्यावर सामूहिक अत्याचार करण्याच्या धमकीच पत्र स्पीड पोस्टद्वारे प्राप्त झाल्यानं खळबळ उडाली. धमकीचं हे पत्र अमीर नावाच्या व्यक्तीनं हैदराबाद येथून पाठवलं आहे.



काय दिली धमकी : तुम्ही हिंदूबाबत अधिक बोलता हे योग्य नाही. मला दहा कोटी रुपये द्या, अन्यथा मी तुमच्या घरासमोर.... तुमच्यासोबत काही अनर्थ देखील मी करणार. तुमच्यावर सामूहिक अत्याचार केला जाईल, अशी धमकी या पत्राद्वारे नवनीत राणा यांना देण्यात आली. माझे नातेवाईक दुबई आणि पाकिस्तानमध्ये असल्याचा उल्लेख देखील या पत्रात आहे. तुम्हाला जीवे मारण्यात येईल, अशी धमकी देखील या पत्राद्वारे देण्यात आली. ही माहिती नवनीत राणा यांचे स्वीय सहाय्यक विनोद गुहे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. या पत्रासंदर्भात राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार देणार आहे, असं विनोद गुहे यांनी सांगितलं.



**मी तुमच्यावर सामूहिक अत्याचार करेन**

पुढे बोलताना, तुम्ही हिंदूबाबत बोलता. हे योग्य नाही. मी तुमच्यावर सामूहिक अत्याचार करेन तसेच मला १० कोटी रुपये द्या अन्यथा मी तुमच्या घरासमोर गाय कापेन, अशी धमकीही त्याने दिल्याचेही विनोद गुहे यांनी सांगितलं आहे. या पत्रासंदर्भात राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली असून याप्रकरणी तत्काळ कारवाई करून पत्र पाठवण्याऱ्या व्यक्तीला अटक करावी, अशी मागणीही विनोद गुहे यांनी केली आहे.

**धमकीचे पत्र हे इंग्रजी लिपीत**

दरम्यान, माजी खासदार नवनीत राणा यांना पाठवलेले धमकीचे पत्र हे इंग्रजी लिपीत असून त्याचा मजकूर मात्र हिंदीमध्ये आहे. तसेच या पत्राच्या दोन्ही बाजूंनी हे पत्र लिहिण्यात आले आहे. हे पत्र ज्या पाकिटामधून पाठवण्यात आले, त्या पाकिटावर नवी दिल्ली येथील पत्त्यासह रवी राणा यांच्या शंकर नगर येथील घराचा पत्ता खाली बारीक अक्षरात इंग्रजीमध्ये लिहिला आहे.

**नवनीत राणांना यापूर्वीही जीवे मारण्याची धमकी**

महत्त्वाचे म्हणजे माजी खासदार नवनीत राणा यांना अशाप्रकारे धमकी देण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी मार्च महिन्यात नवनीत राणा यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यावेळी धमकी देणाऱ्याने व्हॉटसअॅपवर एक ध्वनिफित पाठवून ही धमकी दिली होती. या ध्वनिफितमध्ये त्यांनी शिविगाळदेखील करण्यात आली होती.

# होमगार्ड्ससाठी खूशखबर; आता मिळणार देशातील सर्वाधिक मानधन, देवेंद्र फडणवीसांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

पोलिसांच्या बरोबरीने राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होमगार्ड्स महत्त्वाची भूमिका बजावत असतात. पण गेल्या काही काळापासून होमगार्ड्सचे मानधन वाढविण्यासंदर्भात वारंवार मागणी केली जात होती. आज अखेर दसऱ्याच्या मुहूर्तावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य केली असून मानधनात दुप्पट वाढ केली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट करून ही माहिती दिली आहे. ते म्हणाले, राज्यातील होमगार्ड्सचे मानधन जवळजवळ दुप्पट करण्यासंबंधीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. प्रतिदिन ५७० रुपयांवरून ते आता १०८३ रुपये इतके करण्यात आले आहे. आता हे मानधन देशात सर्वाधिक आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, याशिवाय विविध भत्त्यांची रक्कम सुद्धा दुप्पट करण्यात आली आहे. उपहार भत्ता १०० वरून २०० रुपये तर भोजन भत्ता १०० वरून २५० रुपये इतका करण्यात आला आहे. राज्यातील सुमारे ५५,००० होमगार्डना या निर्णयाचा लाभ मिळेल.



१ ऑक्टोबर २०२४ पासून ही वाढ देण्यात येईल. गेल्याच महिन्यात सुमारे ११,२०७ होमगार्ड्सची भरती प्रक्रिया सुद्धा पूर्ण करण्यात आली आहे. सध्या त्यांचे प्रशिक्षण करण्यात येते आहे. सर्वांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा!

दि. १ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले होते. या बैठकीत राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. होमगार्ड यांच्याबरोबरच कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, तसेच अनुकंपा धोरणाही लागू करण्यात येणार, ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्यात येणार असल्याचे मंत्रिमंडळ बैठकीनंतर जाहीर केले गेले.

९ ऑक्टोबर रोजी काढलेल्या शासन निर्णयाची प्रत देवेंद्र फडणवीस यांनी एक्स वर शेअर केली आहे. शासन निर्णयात होमगार्डची स्थापना आणि त्यांच्या जबाबदाऱ्यांची माहिती देण्यात आली आहे. होमगार्ड संघटनेची स्थापना दि. ६ डिसेंबर १९४६ रोजी झाली. सदर संघटनेत स्वतःचा व्यवसाय व नोकरी सांभाळून स्वयंस्फुर्तीने देशसेवा करण्याच्या उद्देशाने नागरिकांची मानसेवी स्वरुपात होमगार्ड स्वयंसेवक म्हणून भरती करुन घेण्यात येते. कायदा व सुव्यवस्था राखणे, नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्तींमध्ये पोलिसांना सहाय्य करणे, तसेच संप काळात अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यास सहाय्य करणे, ही होमगार्ड स्वयंसवेकांची प्रमुख कर्तव्य आहेत.

# उद्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव

## पथसंचलन, घोष पथक, योगासनाचे प्रात्यक्षिक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उत्सवांपैकी अनन्य साधारण महत्त्व असलेला अमरावती महानगराचा श्री विजयादशमी उत्सव रविवारी (ता.१३) सायंकाळी सहा वाजून ३० मिनिटांनी किरणनगर येथील श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाच्या मैदानात आयोजिण्यात आलेला आहे.

हिंदू समाजातील शक्ती, भक्ती, परंपरा व पराक्रमाचा जागर उत्सवाला करणारा मोठ्या विजयादशमी उत्साहात साजरा करण्यासाठी स्वयंसेवक मागील अनेक दिवसांपासून विविध कवायतींचा सराव करत होते. या सर्वांचे प्रकटीकरण या उत्सवात होणार आहे. यंदाच्या विजयादशमी उत्सवात प्रमुख अतिथी म्हणून टोंगसे पाटील बिल्डकॉमचे संचालक इंजिनियर श्रीकृष्ण महादेवराव टोंगसे उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ता म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारणी सदस्य डॉ. मनमोहन वैद्य उपस्थीत राहून मार्गदर्शन करणार आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयादशमी उत्सवात पथसंचलन, घोष पथक, सुभाषित, अमृतवचन, सामूहिक संगीत, दंड, निःयुद्ध, व्यायाम योग आदींचे प्रात्यक्षिक होणार आहे. पथ संचलनाची सुरुवात नरसम्मा कॉलेज मेन गेट, विदर्भ प्रीमियर सोसायटी, जुना बायपास, कमल प्लाझा कडे–दस्तूर नगर चौक, आयुर मॉल, फरशी स्टॉप साहू मेडिकल पासून परत नरसम्मा कॉलेज येथे समारोपीय कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाला सहपरिवार, इष्टमित्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन महानगर संघचालक प्रा. उल्हास बपोरीकर यांनी केले आहे.

# आमदार अमोल मिटकरींच्या हस्ते रावणाची मनोभावे पूजा आणि आरती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अकोला**

देशभरात मोठ्या उत्साहात विजयादशमी दसरा साजरा होत असून सकाळपासूनच सर्वजण एकमेकांना विजयादशमीच्या शुभेच्छा देत आहेत. देशातील अनेक भागात विशेषत:उत्तर प्रदेशात आज रावणाचे दहन करण्याची प्रथा आहे. राजधानी दिल्लीतही सेलिब्रिटी व बड्या नेत्यांच्या उपस्थितीत रावण दहन केले जाते. मात्र, देशात आणि राज्यात रावणदहनाच्या प्रथेवर बंदी आणण्याची मागणी राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. आमदार अमोल मिटकरी यांनी आज अकोला जिल्ह्यातील सांगोळा गावात रावणाची महाआरती केली. यावेळी आदिवासी समाज आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, गेल्यावर्षी दसऱ्या



दिनी आमदार अमोल मिटकरींनी सांगोळा गावातील रावण मंदिराचा जिर्णोद्धार करण्याची भूमिका मांडल्यानंतर देशभरात मोठा गदारोळ निर्माण झाला होता. आता, त्यांनी देशात रावण दहन ही प्रथाच बंद करण्याची मागणी केल्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

आमदार अमोल मिटकरींच्या हस्ते रावणाची मनोभावे पूजा आणि आरती पाहून तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसला असेल. हे दृष्य रावणाची पुजा करणाऱ्या कोणत्या दाक्षिणात्य राज्यातलं नाही. हे दृष्य आहेय आपल्या महाराष्ट्रातल्या अकोला जिल्ह्यातलं. अकोल्यापासून ५० किलोमीटरवर असलेलं पातूर तालूक्यातील सांगोळा हे गाव आहे. या गावाच्या अगदी सुरुवातीलाच एका मंदिरवजा चौथऱ्यावर रावणाची एक अतिशय सुंदर, रेखीव मूर्ती आहे. सुमारे अडीचशे वर्षांची परंपरा या मूर्तीला असून मोठा इतिहास गावाला आहे. सध्या राज्यात आदिवासी संघटनांचा रावणदहनाला विरोध आहे. आता, चक्क विधापरिषद सदस्य असलेल्या आमदार अमोल मिटकरींनी अशी मागणी केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.





